**नियमीत दिवाणी दावा क्रमांक २९/२०२६**
विक्रम वि. शासन
CNR No. MHOS140000362026

# अर्ज निशाणी २५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ अनुसार दाखल केला आहे. अर्जातील कथन की निशाणी क्र. २२ अनुसार दाव्यास प्रतिवादीनी त्यांची लेखी कैफियतील परिच्छेद क्र. १७/३ मध्ये दर्शविलेल्या नकाशात अनावधानाने "१२" अंकाचे दक्षिणेस "पूर्व पश्चिम रेषा दाखवणे" व त्या रेषाच्या दक्षिणेस "१३" अंक लिहिण्याचे राहून गेले आहे. तरी प्रमाणे दुरुस्ती लेखी कैफियतमध्ये करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. वादींनी प्रस्तुत अर्जास त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास विरोध दर्शविला आहे.

३. उभय पक्षांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. उभय पक्षांचे कथनावरुन खालीलप्रमाणे मुद्दे काढुन त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय? | होय |
| २ | कोणता आदेश? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्रमांक १ व २ करिता

५. संचिकेचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वाद मिळकती संदर्भात निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनावरुन असे दिसून येते की, निशाणी क्र. २२ अनुसार प्रतिवादींनी त्यांची लेखी कैफियत दाखल केली आहे. लेखी कैफियतीत परिच्छेद क्र. १७/३ मध्ये नकाशा

दर्शविण्यात आलेला आहे. सदर नकाशामध्ये प्रतिवादींनी अर्जास सुचविलेली दुरुस्तीची परवानगी मागितलेली आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वर नमुद नकाशाबाबत लेखी कैफियत मध्ये मजकुर नमुद असणे आवश्यक आहे. सबब, वरील करणांचा विचार केला असता प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्याअनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज **निशाणी क्रमांक २५ मंजुर करण्यात आला.**

२. प्रस्तुत अर्जात सुचविलेली दुरुस्ती प्रतिवादींनी आजपासून आठ दिवसांच्या आत लेखी कैफियतमध्ये करुन दुरुस्त प्रत सादर करावी.

३. प्रतिवादीस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी कॉस्ट रक्कम रुपये ३००/- वादी पक्षास द्यावेत.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.06.09 17:18:27 +0530

दिनांकः-०९.०६.२०२६

( **अ. अ. शेख** )

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G.I.Khobre<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 09-06-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 09-06-2026 |
| Order uploaded on | - | 09-06-2026 |